दि.२५/६/२०१९

# प्रेसनोट

**आलोसे सुनतीलाल शिवाजी गावीत, तलाठी,वाडीव–हे, ता.इगतपुरी,जि.नाशिक यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये शिक्षा झाले बाबत**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | वाडीवऱ्हे पोलीस. स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण गुरनं. ३०१७/२०१४ |
| **कलम** | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे |
| **आरोपींचे नांव व कार्यालय** | सुनतीलाल शिवाजी गावीत, तलाठी, वाडीव–हे, ता.इगतपुरी, जि.नाशिक |
| **मागणी कलेली लाचेची रक्कम** | ४००/–रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ४००/–रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे वडीलोपार्जीत शेतगट क्रमांक ५३ चे फेरफार रजिष्टरच्या ६ (ड) नोंदीच्या नक्कला देणेकरीता आलोसे सुनतीलाल शिवाजी गावीत, तलाठी, वाडीव–हे, ता.इगतपुरी, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ४००/– रुपये लाचेची मागणी केली त्यावरून तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक १३/८/२०१४ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे सुनतीलाल शिवाजी गावीत, तलाठी, वाडीवऱ्हे, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ४००/– रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम वाडीवऱ्हे बाजार पटांगणात स्विकारली असता त्यांना पकडण्यात आल्याने त्यांचे विरुध्द वाडीवऱ्हे पोलीस. स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण गुरनं. ३०१७/२०१४ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक.१४/८/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन त्यांचेविरुध्द मा.नाशिक न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर खटल्याचा दिनांक. २५/०६/२०१९ रोजी मा श्री.जे.पी.झपाटे, जिल्हा व सत्र न्यायधिश, क्र.४ नाशिक यांनी निकाल दिला असून त्यात सुनतीलाल शिवाजी गावीत, तलाठी, वाडीवऱ्हे, जि.नाशिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायदा **<u>कलम ७ प्रमाणे</u>** – ३ वर्ष कैद व १०,०००/–रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिना सक्त मजुरीची कैद तसेच **<u>कलम १३(२) प्रमाणे</u>** – ४ वर्ष कैद व १०,०००/–रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिना सक्त मजुरीची कैद अशी शिक्षा ठोठावलेली आहे.सदर खटल्याचे कामकाज सरकारपक्षातर्फे श्रीमती विद्या जाधव, सहा.सरकारी अभियोक्ता, नाशिक यांनी पाहिलेले आहे. |

लाचलुपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन : acbmaharastra.net

टोल फ्री क्र. : १०६४

दुरध्वनी क्र. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०

व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

25.6.19

( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

